## ज्ञानदीप को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि., मुंबई

स्थावर मिळकत जाहीर पुर्नर लिलाव (तृतीय) नोटीस
जा.क्र/वसुली/स्थावर/लिलाव/२८६/सन २०२४-२४.
मे. वसूली व विक्री अधिकारी,
महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व अधिनियम १९६१ चे नियम १०७ अन्वये अधिकार प्राप्त,
संलग्नित - ज्ञानदीप को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.,मुंबई.
सपर्क क्रमांक - ९७६६५००५९३/ ९५६१०००२३८
दिनांक : ०४/०६/२०२४

तमाम सर्व लोकांना कळविणेत येते की, ज्ञानदीप को-ऑप क्रेडीट सोसायटी लि.,मुंबई या संस्थेचे सभासद कर्जदार लवादी थकबाकीदार श्री. बापु बाबुराव दिवेकर व श्री. संदीप बाबुराव दिवेकर यांचेकडून थकबाकीची वसुली करणेसाठी संस्थेने मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (परसेवा) यांचेकडून महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र संपादन केले आहे. या प्रमाणपत्रान्वये व मला महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६० चे कलम १५६ व अधिनियम १९६१ चा नियम १०७(११) चे अधिकार प्राप्त झालेवरून त्याची स्थावर मिळकत जप्त केली आहे. दि. ०६/०७/२०२४ रोजीच्या स्थावर जाहीर पुर्नर लिलाव (द्वितीय) लिलावास कोणीही बलीदार उपलब्ध न झाल्याने त्या मिळकतीचा जाहीर पुर्नर लिलाव (तृतीय) त्यांचे नावासमोर दर्शवलेल्या तारखेस व वेळेस, ठिकाणी करण्यात येणार आहे.
तरी ज्यांना सदर मिळकत लिलावात बोली लावून घ्यावयाची असेल त्यांनी रक्कम रू. २५०००/- डी.डी अथवा रोख स्वरूपात अनामत (बयाना) म्हणून वार सोमवार दिनांक १२/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत भरणा करून समक्ष हजर रहावे.

| थकबाकीदाराचे नाव व पत्ता | दिनांक ०६/०७/२०२४ पर्यंत येणे कर्ज रक्कम व्याज व इतर रक्कम | लिलाव करावयाची मालमत्ता तपशील | एकूण क्षेत्रफळ | लिलाव करावयाची तारीख, वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|---|
| श्री. बापु बाबुराव दिवेकर श्री. संदीप बाबुराव दिवेकर पत्ता- मु.पो. भोरावजीमळा, वरंवंड ता.दौंड जि.पुणे | रु. ४४,२६,२४३/- | श्री. बापु बाबुराव दिवेकर नावावरील मौजे बारामती ता. बारामती , जि. पुणे येथिल बारामती नगर परिषदेच्या वाढीव हद्दीतील स.नं. २६/१+२६/२/अ पैकी मंजुर ले-आऊट मधील बिगरशेती प्लॉट नं. ५ यांसी क्षेत्र १८२.७० चौ.मी.आकार १३९ रू ३९ पैसे व बिगरशेती प्लॉट नं. ६ यांसी क्षेत्र १८२.७० चौ.मी.आकार १३९ रू. ३९ पैसे या दोन्ही प्लॉटमध्ये बांधलेल्या विश्वास नगर, गुनवडी रोड, बारामती देवराज अपार्टमेंट-सी या इमारतीमधील पार्किंगवरील पहिला मजला (स्टिल्टेड फर्स्ट फ्लोअर) निवासी सदनिका/फ्लॅट नं. ७ (सात) क्षेत्र ८४१.०० चौ. फुट म्हणजेच ७८.१५ चौ.मी. बिल्टअप हि संपूर्ण मिळकत. | ८४१.०० चौ. फुट म्हणजेच ७८.१५ चौ.मी. बिल्टअप हि संपूर्ण मिळकत. | सोमवार दि. १२/०८/२०२४ सकाळी ११.०० वाजता ज्ञानदिप को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. मुंबई शाखा कुरकुंभ, ता. दौंड, जि. पुणे ४१३८०२. |

अ.क्र.१ च्या मिळकतीची वाजवी किंमत रूपये २२,२५,०००/- (रू. बावीस लाख पंचविस हजार मात्र)
टिप :-
१. विक्री करीताचे बोली अर्ज आणि अटी व शर्ती ज्ञानदीप को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., मुंबई शाखा कुरकुंभ ता दौंड जि पुणे येथे कोणत्याही कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते सांयकाळी ५.०० या वेळेत टेंडर फॉमसाठी रू. १०००/- (ना परतावा) भरून प्राप्त करता येतील.
२. बोलीदाराने लिलावाच्या दिवशी बोली करता स्वतः भाग घ्यावयास हवा, लिलावात भाग घेण्याची सुरक्षा रक्कम भरणा करणे आवश्यक आहे.
३. बोलीधारकाने १ पासपोर्ट आकाराचा फोटो आणि निवासाच्या पुराव्यासह जसे पॅनकार्ड/आधारकार्ड यासारख्या के. वाय.सी कागदपत्रांची स्वयंसाक्षांकीत प्रती लिलावाच्या वेळी जमा करावे. सोबत मुळ प्रत पडताळणीसाठी आणावी.
४. मालमत्तेची विक्री काटेकोरपणे जशी आहे जेथे आहे तत्वावर आणि जशी आहे व जी आहे तत्वावर करण्यात येईल, आणि इच्छुक बोलीदाराने मालमत्तेविरूध्द असलेला कोणताही दावा देय, प्रभार, कर, देणी, आणि/ किंवा इतर कोणतेही दायीत्व याबाबत स्वतंत्रपणे चौकशी करावी, जर अशी काही देणी असल्यास बोलीदाराने त्यांचे दायीत्व स्विकारायचे आहे सदर मालमत्तेवर एखादी देणे असल्याबाबत पतपेढीस काहीही माहीत नाही.
५. लिलाव प्रकीयेमध्ये वसुली अधिकारी यांनी प्राप्त केलेल्या उच्चतम बोली रक्कमेपासून बोली पुढे सुरू होईल, आणि बोली नंतर बोलीधारकांवर नमुद केल्या प्रमाणे त्याची बोली मालमत्ता किमान रू. १०,०००/- ने वाढवण्यास परवानगी देण्यात येईल.
६. यशस्वी बोलीदाराने ठरलेल्या खरेदी रक्कमेच्या १५ टक्के (लिलाव सुरक्षा रक्कम समाविष्ठ), त्यांची बोली स्विकारण्यात आल्या नतंर म्हणजे त्याच दिवशी भरणा करावी, उर्वरित शिल्लक रक्कम लिलावा दिनांका पासून पुढील ३० दिवसात भरणा करणे आवश्यक आहे.
७. जर यशस्वी बोलीदार कलम ६ मध्ये नमुद केल्यानुसार बोली रक्कमेच्या १५ टक्के भरणा करण्यास अयशस्वी ठरल्यास त्याने जमा केलली सुरक्षा रक्कम जप्त केली जाईल आणि विक्री रद्द झाली असे समजले जाईल, तसेच जर बोलीदार उर्वरित शिल्लक रक्कम विक्री निश्चित झाल्यानंतर १५ दिवसाच्या आत भरणा न करू शकल्यास त्याने भरलेली १५ टक्के रक्कम जप्त केली जाईल
८. विक्री निश्चित झाल्यानंतर कलम ६ नुसार रक्कम भरणा झाल्यानंतर विशेष वसुली व विक्री अधिकारी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदी नुसार मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे लिलाव कायम व विक्री दाखला मिळवण्याकामी विनंती अर्ज सादर करतील विक्री प्रमाणपत्रास आवश्यक ती स्टॅम्प ड्युटी, नोंदणी फी, तसेच टी. डी. एस/ जी. एस. टी, रक्कम भरणा करणे आवश्यक राहील.
९. विशेष वसुली व विक्री अधिकारी यांना कोणतेही कारण न देता आणि पुर्व सुचनेशिवाय लिलाव रद्द करणे/ पुढे ढकलणे अथवा कोणतेही बोली स्विकारणे किंवा नाकारण्याचा आणि विक्रीच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये सुधारणा करण्याचा सर्व अधिकार राहील.

सही/-
संदीप बंडु धसाडे
विशेष वसुली व विक्री अधिकारी,
(महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये)

दिनांक : ०६/०७/२०२४
ठिकाण : कुरकुंभ

## टाटा कॅपिटल लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालयः अकरावा मजला, टॉवर ए, पेनिन्सुला बिजनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई- 400013.

### मागणी सूचना

**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 मधील अनु. 13(2) अंतर्गत मागणी सूचना.**

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे टाटा कॅपिटल लि. (पूर्वी आणि विलीनीकरणापूर्वी टाटा कॅपिटल फायनान्शियल सर्व्हिसेस लि. म्हणून ओळखले जाणारे) चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 3 सह वाचण्यात येणारया अनुच्छेद 13(2) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली दिल्यानुसार **मागणी सूचना** पाठविल्या ज्यांत कर्जदार/ सह-कर्जदार / बाध्यताधारी यांना संबंधित मागणी सूचनेत नमूद करण्यात आलेल्या रकमेचा सदर सूचनेच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत खाली दिलेल्या तपशीलानुसार भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. सदर कर्जदार/ सह-कर्जदार/ बाध्यताधारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे टाटा कॅपिटल लि. (टीसीएल) यांचेकडे भरणा न केल्यास टीसीएल यांचेद्वारे सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(4) आणि लागू नियमांतर्गत संपूर्णपणे कर्जदार/ सह-कर्जदार/ बाध्यताधारी यांच्या खर्चाने व त्यांना भोगाव्या लागणारया परिणामांवर सदर अनामत मत्ता / अचल मालमत्तांविरुद्ध कारवाई करण्यास सुरुवात करतील. सदर कर्जदार/ सह-कर्जदार/ बाध्यताधारींना आमची पूर्व-परवानगी न घेता सदर अनामत मत्तांवर भाड्याने किंवा लायसन्स\वर किंवा इतर कोणत्याही पद्धतीने कोणत्याही प्रकारचा हितसंबंध किंवा अधिकार निर्माण करण्यास किंवा अनामत मत्तेचे हस्तांतरण करण्यास मज्जाव करण्यात येतो आणि ही बाब सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग (13) अंतर्गतसुद्धा प्रतिबंधित आहे. हेही लक्षात घ्यावे की सदर अधिनियमातील अनुच्छेद 29 नुसार कुणाही व्यक्तीने सदर अधिनियमातील तरतुदींचे किंवा त्या अंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांचे उल्लंघन केल्यास किंवा तसे करण्याचा प्रयत्न केल्यास किंवा इतर कुणास तसे करण्यास चिथवल्यास एक वर्षाचा कारावास किंवा दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा होऊ शकते. सदर कर्जदार/ सह-कर्जदार/ बाध्यताधारींचे लक्ष सर्फेसी अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग (8) मधील तरतुदींकडे वेधण्यात येते ज्यानुसार आपण जाहीर लिलावाद्वारे, सर्व लोकांकडून दरपत्रके, निविदा मागविणे, किंवा खाजगी तहाद्वारे अनामत मत्तेच्या विक्रीसाठी सूचना प्रकाशित होण्याच्या दिनांकापर्यंत संपूर्ण थकबाकी रकमेचा टीसीएल यांना आलेल्या खर्च, शुल्के व अधिभारांसह भरणा करू शकता. कृपया हेही लक्षात घ्यावे की आपण जाहीर लिलावाद्वारे, सर्व लोकांकडून दरपत्रके, निविदा मागविणे, किंवा खाजगी तहाद्वारे अनामत मत्तेच्या विक्रीसाठी सूचना प्रकाशित होण्याच्या दिनांकापर्यंत संपूर्ण थकबाकी रकमेचा टीसीएल यांना आलेल्या खर्च, शुल्के व अधिभारांसह भरणा न केल्यास आपणांस सदर अनामत मत्ता सोडवून घेता येणार नाही. कुणाही व्यक्तीने सदर अधिनियम किंवा नियमांमधील तरतुदींचे उल्लंघन केल्यास किंवा तसे करण्यास चिथवल्यास सदर अधिनियमातील तरतुदीनुसार ते कृत्य कारावास व / वा दंडास पात्र ठरेल.

| अ. क्र. | कर्ज खाते क्र. | बाध्यतादार/कायदेशीर वारस/ कायदेशीर प्रतिनिधीचे नाव | मागणी सूचनेतील रक्कम | एनपीए दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | TCFLA 0277 0000 1106 5235 | **1) मे. हिमालय ट्रेडलिंक्स, त्याचे भागीदार श्री. विलास माधव अटल यांच्या मार्फत प्रतिनिधित्व, 2) मे. हिमालय डिस्ट्रीब्युटर्स यांचे भागीदार श्री विलास माधव अटल यांच्या मार्फत प्रतिनिधित्व, 3) श्री विलास माधव अटल, 4) श्री अनुराग विलास अटल, अ क्र. 1 ते 4 यांचा पत्ताः** युनिट क्र. 1, 2, 3, कासट केमिकल रोड, साई इंडस्ट्रियल इस्टेट, कोथरूड, पुणे 411038 **तसेच येथे-** शोरूम क्र. 19 (1 इंडेक्स II पुसार- शोरूम क्र. 119), पहिला मजला, गॅलेक्सी वन, इअॅन आयटी पार्क जवळ, एस. क्र. 75, हिसा क्र. 1, गाव खराडी, पुणे-411014. **तसेच येथे-** फ्लॅट क्र. 601 सहावा मजला, बिल्डिंग ए-7, करिश्मा सोसायटी, कोथरूड, पुणे 411038, **5) रचना नितीन कोतवाल, पत्ताः** श्री शैल्य अपार्टमेंट, प्रभात रोड, आयकर कार्यालय जवळ 111/11 ए, एरंडवणे, पुणे 411004 **तसेच येथे-** मे. हिमालय ट्रेडलिंक, युनिट क्रमांक 1, 2, 3, साई इस्टेट, कोथरूड, पुणे- 411038 | **रु. 2,19,11,341/-** (रुपये दोन कोटी एकोणीस लाख अकरा हजार तीनशे एक्केचाळीस फक्त) दि. 08/06/2024 रोजी नुसार देय **मागणी सूचना दिनांक-** 10/06/2024 | 07/06/2024 |

**अनामत मालमत्तेचे वर्णनः** पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, शोरूम क्र. 119 (मंजुर योजनेनुसार शोरूम क्र. 19) चटई क्षेत्र मोजमाप 91.96 चौ. मीटर म्हणजे 990 चौ. फूट, "गॅलेक्सी वन" म्हणून ओळखल्या जाणारया इमारतीतील पहिल्या मजल्यावर, जे सर्व्हे क्रमांक 75, हिसा क्रमांक 1, मोजमाप सुमारे 01 हेक्टर 81 आर आणि अधिक पोटखरबा मोजमाप सुमारे 00 एच 01 आर, संपूर्णपणे मोजमाप 01 एच-82 आर, ज्यापैकी 01एच -51.25 आर यावर बांधलेले आहे, महसूल गाव खराडी येथे स्थित, जे पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत आहे आणि नोंदणी कार्यक्षेत्राच्या हद्दीत, तालुकाः हवेली, जिल्हाः पुणे. सोबत एक कव्हर कार ; पार्किंग सह.

दिनांकः 11 जुलै 2024
स्थानः पुणे
प्राधिकृत अधिकारी
टाटा कॅपिटल लिमिटेड.

## PUNE CANTONMENT BOARD

GOLIBAR MAIDAN, PUNE-411 001

### E-TENDER NOTICE-2024-25

Pune Cantonment Board invites e-tenders based on Percentage Rate from the Govt. approved contractors in appropriate class of MES, CPWD, State PWD, Railways and those working with any Cantonment Board through e-tendering for the following work as detailed below. Only online bids will be accepted. The tender forms can be downloaded from www.defproc.gov.in

Interested tenderers with adequate experience given in the tender documents and notice of the tender published on the www.defproc.gov.in, get enrolled / registered through this website with valid digital signature certificate mentioned on the website.

Other details and particulars regarding the tender notice can be had from the office of the Cantonment Board Pune on any working day during working hours and downloaded from the official website pune.cantt.gov.in

The Cantonment Board / Chief Executive Officer reserves the right to accept or reject any or all applications / tenders without assigning any reason.

Date : 10-07-2024

CHIEF EXECUTIVE OFFICER
PUNE CANTONMENT BOARD
(SUBRAT PAL)

## बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

कर्वे रोड शाखा :
दरेकर हाईटस्, कर्वे रोड, पुणे - ४११००४

### ताबा नोटीस (फक्त स्थावर मालमत्तेकरीता)

ज्याअर्थी खाली सही करणार **बँक ऑफ बडोदाचे** अधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसटेस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी (सेकन्ड) इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या सेक्शन १३(१२) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट रुल्स् २००२ च्या **रुल ३** अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून **कर्जदार श्री. अभिजित सतिश भाडे, श्री. सतिश विष्णूपंत भाडे, सौ. कल्पना सतिश भाडे,** स. नं. ६६८, जी-५८, दुसरा मजला, भाग्यश्रीनगर को-ऑप हौसिंग सोसायटी, बिबवेवाडी, पुणे - ४११०३७ यांना **दि. २५/०४/२०२४** रोजी **मागणी नोटीस** बजावली होती की, त्यांनी सदर नोटीसीत नमूद केलेली बँकेला येणे असलेली एकूण रक्कम **रु.१४,२५,६२०/- (रुपये चौदा लाख पंचवीस हजार सहाशे वीस फक्त)** सदर नोटीस मिळालेल्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परत करावी.

कर्जदार सदर रक्कम परत करण्यास असमर्थ ठरल्याने, कर्जदार तसेच सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या **सब-सेक्शन (४) सेक्शन १३** आणि **सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स् २००२** च्या **रुल ८** अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खाली नमूद केलेल्या मालमत्तेचा **दि. ०४ जुलै, २०२४** रोजी **ताबा घेतला आहे.**

विशेषतः वर नमूद केलेले कर्जदार तसेच सर्वसाधारण जनता यांना सावध करण्यात येते की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात कोणताही व्यवहार करू नये. असा व्यवहार केल्यास तो **बँक ऑफ बडोदा** यांना येणे असलेली रुक्कम **रु.१४,२५,६२०/- (रुपये चौदा लाख पंचवीस हजार सहाशे वीस फक्त) आणि त्यावरील व्याज** अशा सर्व रक्कमेच्या अधीन राहील.

निर्धारीत उपलब्ध वेळेमध्ये तारण आस्ति सोडविण्यासाठी कर्जदाराचे लक्ष सदर कायद्याच्या सब-सेक्शन (८) सेक्शन १३ अंतर्गत तरतुर्दीकडे वेधून घेतले जात आहे.

**स्थावर मालमत्तेचा तपशील**

पुढील मालमत्तेचा सर्वसामाईक भाग- फ्लॅट नं. जी५८, जी विंग, भाग्यश्रीनगर को-ऑप हौसिंग सोसायटी, सर्व्हे नं. ६६८/६बी+६ई, बिबवेवाडी, पुणे - ४११०३७. क्षेत्रफळ ५४५ चौ. फू.. श्री. सतिश विष्णूपंत भाडे आणि सौ. कल्पना सतिश भाडे यांच्या मालकीचा. **चतुःसीमा : उत्तरेस -** स. नं. ६६८, **दक्षिणेस -** स. नं. ६६७, **पूर्वेस -** स. नं. ६६८/६सी, **पश्चिमेस-** स. नं. ६६८/६ए

दिनांक : ०४/०७/२०२४
ठिकाण : पुणे
(अखिल एस. पिसाळ)
अधिकृत अधिकारी, बँक ऑफ बडोदा

## पंजाब अँड सिंद बँक

(भारत सरकारचा उपक्रम) पी.एस.बी. येथे सेवा एक जीवनमार्ग आहे.

शाखा- शिवाजी नगर, पुणे (P1032) क्र. 2ए, रचना एपिसेंटर, 64/सी, पुणे-मुंबई रोड, वाकडेवाडी, शिवाजी नगर, पुणे (महाराष्ट्र)- 411005 दूरध्वनी क्र.- 020-25511103; ई-मेल- p1032@psb.co.in

### परिशिष्ट IV
### प्रत्यक्ष ताबा सूचना (अचल मालमत्तेसाठी)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे पंजाब अँड सिंद बँक चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (2002 चा 54) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम 3 सह वाचण्यात येणारया अनुच्छेद 13 (12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत **दि. 31-12-2022 रोजी एक मागणी सूचना पाठवली ज्यात कर्जदार / जामीनदार मे. अल्विमा फार्म्स प्रा. लि., श्री. आलोक चंद्रकुमार उपाध्याय, श्री. प्रशांत कृष्णराव शितोळे, श्री. विजयकुमार नारायण खेडकर यांना सूचनेत नमूद केलेल्या रु. 1,42,23,099.52 (रुपये एक कोटी बेचाळीस लाख तेवीस हजार नव्याण्णव आणि बावन्न पैसे फक्त)** चा सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते.
कर्जदार सदर रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने कर्जदार व सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स, 2002 मधील नियम 8 सह वाचण्यात येणारया सदर अधिनियमाच्या कलम 13 च्या उप कलम (4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत **दि. 8 जुलै 2024 रोजी** खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतलेला आहे.
कर्जदार व सर्वसामान्य जनतेस याद्वारे सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो **पंजाब अँड सिंद बँक यांच्या रु. 1,42,23,099.52 (रुपये एक कोटी बेचाळीस लाख तेवीस हजार नव्याण्णव आणि बावन्न पैसे फक्त)** आणि त्यावरील व्याजाच्या भारधीन असेल.
सदर अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप- विभाग (8) कडे वेधण्यात येते.

**अचल मालमत्तेचे वर्णन**

**मालमत्ता 1: मालकः श्री. आलोक चंद्रकुमार उपाध्याय**
**पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, फ्लॅट क्र. 6 मोजमाप 725 चौ. फू. अशोका क्लासिक को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लिमिटेड या नावाने ओळखल्या जाणारया इमारतीच्या दुसरया मजल्यावर, ज्ञानेश पार्क गल्ली क्र. 1 कृष्णा चौक, सर्व्हे क्र. 48 हिस्सा क्र. 2/1 मधील प्लॉट क्र. 5, गाव पिंपळे गुरव तालुका हवेली, नोंदणी उप -जिल्हा हवेली क्र. 1 ते 28 आणि जिल्हा पुणे**
**चतुःसीमाः** उत्तरेकडेः लेआउट चे उर्वरित क्षेत्र
दक्षिणेकडेः सदर स. क्र. चे उर्वरित क्षेत्र.
पुर्वेकडेः 20 फूट रस्ता आणि प्लॉट क्र. 5 चे उर्वरित क्षेत्र
पश्चिमेकडेः 60 फूट डी पी रस्ता

**दिनांकः 08.07.2024**
**स्थानः पुणे, महाराष्ट्र**
स्वा/- प्राधिकृत अधिकारी,
पंजाब अँड सिंद बँक

## जाहीर नोटिस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत कि तुकडी पुणे, पोट तुकडी ता. हवेली, मौजे कोथरूड येथील प्लॉट नं. २५,२६ व २७ सर्वे नं. ८९/२ व ९०/२, सिटी सर्वे. नं. ९७९,९८३ व ९८४ वरील वृंदावन गार्डन सहकारी गृहरचना संस्था मर्यादित मधील तळमजल्यावरील दुकान क्र. एस-१३ या मिळकतीबाबतचा दिपक शामराव खुर्जेकर व मानसी दि. खुर्जेकर यांनी तारीख १८.०४.१९९६ रोजी सतीश रामराव राळे यांचे लाभात लिहून दिलेला मे. सब - रजिस्ट्रार साहेब, हवेली क्र. ४ यांचे कार्यालयातील दस्त क्र. २८६०/१९९६ अन्वये नोंदविलेल्या करारनाम्याचा मूळ दस्त त्याची सूची क्र. २ व नोंदणीपावतीसहित (**सदर मूळ दस्त**) गहाळ झाला आहे अथवा त्यांचे ताब्यात नाही. तसेच त्यांनी त्याबाबत वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात एफ. आय. आर. क्र. १६८६६-२०२४ तारीख १०.०७.२०२४ देखील नोंदविलेला आहे व सदर मिळकतीसाठीचा दिपक शामराव खुर्जेकर, मानसी दि. खुर्जेकर व सतीश रामराव राळे यांचेमधील खरेदीखताचा दस्त देखील झलेला नाही. सदर मिळकतीवर कोणताही बोजा निर्माण केलेला नाही अगर सदर मूळ दस्ताचा दुरुपयोग केलेला नाही असा भरवसा जीवन प्रकाश कडू व ज्योती प्रकाश कडू यांनी पिरामल कॅपिटल अँड हौसिंग फायनान्स लिमिटेड यांना देऊन सदर मिळकत त्यांचे लाभात गहाण देऊ केली आहे. तसेच सदर मूळ दस्त उपलब्ध नसल्या कारणाने जर पिरामल कॅपिटल अँड हौसिंग फायनान्स लिमिटेड यांचे काही नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी सदर जीवन प्रकाश कडू व ज्योती प्रकाश कडू यांनी घेतलेली आहे. तरी सदर मूळ दस्ताबाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा हितसंबंध, हक्क, अधिकार अगर हरकत अगर त्याबाबत माहिती असल्यास त्यांनी सदर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर रजिस्टर पोस्टाने नोंदवावी अन्यथा सदर मिळकत हि निजोखमी आहे असे समजण्यात येईल.

**मनीष घनश्याम फाटक, ॲडव्होकेट**
पुणे, तारीखः १०.७.२०२४
२४०, शनिवार पेठ, ओंकारेश्वर मंदिराजवळ, पुणे - ४११ ०३०

## महावितरण

### निविदा सूचना

मान्यताप्राप्त व महावितरणच्या नोंदणीकृत ठेकेदाराकडुन सातारा मंडलांतर्गत वाई व वडुज विभागामध्ये बाह्यस्त्रोत कंत्राटी कामगार पुरविणेकरीता निविदा मागविण्यात येत आहेत (वाई विभाग-निविदा क्र. ०८/२०२४-२५ रक्कम रु. ४९६.४१ लक्ष), (वडुज विभाग-निविदा क्र.०९/२०२४-२५, रक्कम रु. ४९९.७८ लक्ष) सदर निविदा ई-टेंडरिंग पद्धतीनेच भरता येतील. त्याकरीता निविदा भरु इच्छिणाऱ्या पुरवठादारांचे महावितरणकडे ई-टेंडरिंग नोंदणी असणे आवश्यक आहे. निविदेबाबतचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहतील. अधिक माहिती व निविदा प्रत **www.mahadiscom.in** या संकेतस्थळावर दि. २३.०७.२०२४ रात्री १२.०० पर्यंत उपलब्ध राहील.

मुख्य कार्यालय, मुंबई
पी.आर.ओ. क्र. १५९/२४
अधीक्षक अभियंता,
महावितरण, मंडल कार्यालय, सातारा.

## ज्ञानदीप को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि., मुंबई

शाखा : कुरकुंभ

### स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस

नमुना झेड (Z)
(नियम १०७ पोट-नियम ११(ड)(१)
**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस**

ज्या अर्थी खाली सही केलेले विशेष वसुली व विक्री अधिकारी, **एस. बी. धसाडे, ज्ञानदीप को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., मुंबई शाखा कुरकुंभ,** (महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६० कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७) अन्वये असुन, **दिनांक १५/०४/२०२१** रोजी मागणीची नोटीस ऋणको **श्री. गणेश मारुती भागवत** यांना देऊन नोटीशीमध्ये नमूद केलेली **रक्कम रू. १,०२,९०७/-** सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून आणि ऋणको याने रक्कम भरणा करणेस कसूर केली आहे, खाली सही करणाऱ्याने **दिनांक ०९/१२/२०२१** रोजी स्थावर मालमत्ता जप्तीची नोटीस दिली असून, पुढे निर्देशित केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.
ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे आणि सर्व नागरीकांना खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्यांना म. स. का. नियम,१९६१ मधील नियम (१०७) (११) (ड) (१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार **दिनांक ०९/१२/२०२१ रोजी ताबा घेतला आहे.**
विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येत आहे की, मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास **श्री. गणेश मारुती भागवत,** यांच्या कर्जाची आज रोजीची येणेबाकी **रक्कम १,१६,८७६/- आणि त्यावरील व्याज** याला अधीन राहावे लागेल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

**श्री. गणेश मारुती भागवत यांचे नावावरील मौजे कुरकुंभ, ता. दौंड, जि. पुणे येथील गट क्र. २५७ मधील ० हे ११ आर क्षेत्र हि मिळकत.**

शिक्का
दिनांक :- २०/०६/२०२४
ठिकाणः कुरकुंभ, ता. दौंड, जि. पुणे.
एस. बी. धसाडे,
विशेष वसुली व विक्री अधिकारी,
(महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये)

महाराष्ट्र शासन

## वस्तू व सेवाकर विभाग, पुणे

### - जाहीर निविदा -

पुणे विभागातील वस्तू व सेवाकर भवन, येरवडा कार्यालयास कंत्राटी पद्धतीने १४ वाहने पुरविण्याकरिता योग्य नोंदणीकृत व मान्यताप्राप्त सेवा पुरविणाऱ्या कंत्राटदाराकडून निविदा कागदपत्रात नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून 'ऑनलाईन' पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत.
१) निविदा प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येईल (ई-निविदा)
२) सदर निविदा अर्ज दिनांक ०८/०७/२०२४ पासून **https://www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध झालेले आहेत.
३) पूर्ण माहितीसाठी **https://www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळाला भेट देण्यात यावी अथवा अपर राज्यकर आयुक्त, पुणे यांचे कार्यालय, चौथा मजला, वस्तू व सेवाकर भवन, पुणे-४११००६, राज्यकर अधिकारी, जनसंपर्क, दूरध्वनी क्रमांक ०२०-२६६०९०१३ येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.
४) या संबंधीची सर्व शुद्धीपत्रके व इतर माहिती **https://www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावरच उपलब्ध होईल. संभाव्य निविदाकारांनी निविदा सादर करावयाच्या शेवटच्या दिनांकापर्यंत सदर संकेतस्थळाला वेळोवेळी भेट द्यावी.
५) कोणतेही कारण न देता, निविदा नाकारण्याचे अथवा रद्द करण्याचे सर्वस्वी अधिकार, निम्नस्वाक्षरित अधिकाऱ्यांचे असतील.

(सही/-)
**- बालाजी वाघमारे, जनसंपर्क अधिकारी,**
**वस्तू व सेवाकर भवन, पुणे**

वस्तू व सेवाकर विभाग, जनसंपर्क कार्यालय, वस्तू व सेवाकर भवन, तळमजला, विमानतळ मार्ग, येरवडा, पुणे-४११००६
(चौकशीकरिता दूरध्वनी क्रमांक ०२०-२६६०१३)

(डीजीआयपीआर/२०२४-२५/७२५)

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)
अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये नोटीस.
कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे

**- : जाहीर नोटीस : -**
**मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ४८२/२०२३/१६६५**

**अर्ज